राज्यातील खरीप- २०१८ हंगामातील दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने बाधित शेतकऱ्यांना वाटप करण्यासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**महसुल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१९/प्र.क्र.१९/म-७**

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांकः- ०४ सप्टेंबर, २०१९

<u>संदर्भ</u> :- १) शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दिनांक :- ३१.१०.२०१८

२) शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१९/प्र.क्र.१९/म-७, दिनांक :- २५.०१.२०१९

३) शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१९/प्र.क्र.१०/म-११, दिनांक :- २९.०१.२०१९

४) शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दिनांक :- १४.०२.२०१९

५) शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१९/प्र.क्र.१९/म-७, दिनांक :- २१.०२.२०१९

६) शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१९/प्र.क्र.१९/म-७, दिनांक :- १०.०७.२०१९

**<u>प्रस्तावना</u> :-**

खरीप हंगाम २०१८ मध्ये महसुल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ३१.१०.२०१८ अन्वये राज्यातील १५१ तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करण्यात आला आहे. दुष्काळ घोषित केलेल्या या १५१ तालुक्यांतील बाधित शेतक-यांना कृषि विषयक मदत वाटपाकरिता संदर्भ क्र. २ येथील दिनांक २५ जानेवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच तीन टप्प्यामध्ये सर्व जिल्ह्यांना निधी वितरीत करण्यात आला आहे.

नाशिक विभागातील १८२३२४६ इतक्या शेतक-यांना एकूण रुपये १२६७८४.२५ लक्ष इतकी रक्कम रूपये वितरीत करण्यात आली आहे. तसेच अमरावती विभागातील ८९३५४९ इतक्या शेतक-यांना ८०००४.३४ लक्ष इतकी रक्कम रूपये वितरीत करण्यात आली आहे. आता विभागीय आयुक्त, नाशिक व विभागीय आयुक्त, अमरावती यांनी केलेल्या अतिरिक्त निधीच्या मागणीनुसार दुष्काळ अनुदान वाटपासाठी निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनाक ७ ऑगस्ट, २०१९ च्या बैठकीत मान्यतेस्तव ठेवण्यात आला होता.

मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनाक ७ ऑगस्ट, २०१९ च्या बैठकीत सादर करण्यात आलेल्या उपरोक्त दोनही प्रस्तावास मंत्रिमंडळ उपसमितीने मंजूरी दिली असून त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक यांना रूपये १४३५५.३४ लक्ष ( अक्षरी रूपये एकशे त्रेचाळीस कोटी पंचावन्न लक्ष चौतीस हजार फक्त ) व विभागीय

आयुक्त, अमरावती यांना रूपये १७४८०.५६ लक्ष ( अक्षरी रुपये एकशे चौऱ्याहत्तर कोटी ऐंशी लक्ष छपन्न हजार फक्त ) असा एकुण रूपये रूपये ३१८३५.९० लक्ष /- ( अक्षरी रूपये तीनशे अठरा कोटी पस्तीस लक्ष नव्वद हजार फक्त ) इतका निधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचारीधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

राज्यातील खरीप हंगाम २०१८ मध्ये संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये दुष्काळ जाहीर करण्यात आलेल्या १५१ तालुक्यांपैकी नाशिक विभागातील शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने मदत वाटप करण्यासाठी निविष्ठा अनुदानाकरीता रूपये १४३,५५.३४,०००/- ( अक्षरी रूपये एकशे त्रेचाळीस कोटी पंच्चावन्न लक्ष चौतीस हजार फक्त ) व अमरावती विभागातील शेतकऱ्यांना रूपये १७४,८०,५६,०००/- ( अक्षरी रुपये एकशे चौऱ्याहत्तर कोटी ऐंशी लक्ष छपन्न हजार फक्त) असा एकुण रूपये रूपये ३१८,३५,९०,०००/- (अक्षरी रूपये तीनशे अठरा कोटी पस्तीस लक्ष नव्वद हजार फक्त ) इतका अतिरिक्त निधी सोबत जोडलेल्या सहपत्रानुसार वितरित करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार सदर रकमेचे वाटप बाधित शेतक-यांना करावे.

३. या प्रयोजनासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक सी-६, प्रधान लेखाशीर्ष - २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१, अवर्षण (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च (९१) (०५) पीक नुकसानीमुळे शेतकऱ्यांना मदत (२२४५ २४३४), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षी उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

४. सदरहु आदेश हे प्रशासकीय मान्यतेचे असून निधी वितरीत करण्याबाबतचे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९०४१२५१५३९०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: CN = Subhash Hanmant Umaranikar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Revenue and Forest Department
Date: 2019.09.04 12:58:48 +05'30'

**( सुभाष उमराणीकर )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
२. मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
३. सर्व लोकसभा सदस्य / राज्यसभा सदस्य (महाराष्ट्रातील)

४. सर्व विधानसभा सदस्य / विधान परिषद सदस्य.
५. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव
६. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग यांचे स्वीय सहायक,
७. अपर मुख्य सचिव (महसूल), महसुल व वन विभाग
८. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
९. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१०. सचिव (मदत व पुनर्वसन)
११. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय,मुंबई-३२
१२. आयुक्त ( कृषि ),कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. महालेखापाल -१ /२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र , मुंबई / नागपूर
१४. महालेखापाल -१ /२ ( लेखा परिक्षा ), महाराष्ट्र , मुंबई / नागपूर
१५. सर्व विभागीय आयुक्त
१६. सर्व विभागीय कृषि सह संचालक
१७. सर्व जिल्हाधिकारी
१८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१९. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२०. सर्व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद
२१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२२. सर्व जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था
२३. वित्तीय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन विभाग यांना निधी वितरित करण्याच्या विनंतीसह अग्रेषित
२४. वित्त विभाग, व्यय -९ / अर्थसंकल्प कक्ष / अर्थोपाय कक्ष ), मंत्रालय , मुंबई.
२५. महसुल व वन विभाग, (म-७ / म११ / म-३), मंत्रालय, मुंबई-३२
२६. सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी कृषि व पदुविभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२७. निवड नस्ती, म-७ कार्यासन.

**शासन निर्णय क्रमांकः- एससीवाय-२०१९/प्र.क्र.१९/म-७, दिनांक ०४ सप्टेंबर २०१९ चे सहपत्र.**

| अ. क्र. | विभाग | जिल्हा | वितरीत करावयाची रक्कम (रु. लाखात) |
|---|---|---|---|
| १) | अमरावती | अमरावती | ७३८.९५ |
| २) | | अकोला | ६१४९.७५ |
| ३) | | यवतमाळ | १६६९.४९ |
| ४) | | बुलढाणा | ८९२२.३७ |
| | | **एकुण अमरावती :-** | **१७४८०.५६** |
| १) | नाशिक | नाशिक | १७९९.११ |
| २) | | धुळे | ५६६९.९१ |
| ३) | | नंदुरबार | १६०.२५ |
| ४) | | जळगांव | २४३५.२८ |
| ५) | | अहमदनगर | ४२९०.७९ |
| | | **एकुण नाशिक :-** | **१४३५५.३४** |
| **वितरित करावयाची एकुण रक्कम (रु.लाखात)** | | | **३१८३५.९०** |

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: CN = Subhash Hanmant Umaranikar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Revenue and Forest Department
Date: 2019.09.04 12:59:03 +05'30'

**( सुभाष उमराणीकर )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन